# क्विक हीलचा सीएसआर

पुणे, क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचा भाग म्हणून आपल्या फाऊंडेशनच्या माध्यमातून नागपूरमध्ये 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड'चे आयोजन केले. सहभागी शिक्षण संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विशेषतः महाराष्ट्राच्या विदर्भ प्रांतातील वंचित समुदायांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता पसरवत केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि सहा सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले.